**-: प्रेस नोट :-**

**'' परसा बाजार पोलीस ठाणे, जिल्हाः पटणा, राज्यः बिहार गु.र.क्र. ०४/२३ कलम ३०२, १२० ब, ३४ भा.द. वी. सह कलम २७ आर्म्स ॲक्ट सह कलम ३ (२) (५) (अ) ( अं ) एस सी एस टी ॲक्ट मधील पाहिजे आरोपीतास साकीनाका पोलीस ठाणेकडुन ताब्यात घेतलेबाबत ''**

दिनाक ०१/०९/२०२३ रोजी निगराणी पथकाचे पोउपनि सुहास कादे व पथक पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना पोउपनि सुहास कादे यांना गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने माहीती मिळाली की, बिहार येथील एका गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपी साकीनाका पोलीस ठाणे हद्दीत आला आहे. सदर प्राप्त माहितीवरून साकीनाका पोलीस ठाणे निगराणी पथकाने सोसायटी मस्जीदच्या जवळ, अंधेरी- घाटकोपर लिंक रोड, साकीनाका, मुंबई ७२ या ठिकाणी जावून शिताफीने एका संशयीत इसमास ताब्यात घेवून त्यास त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव व पत्ता नवीन कुमार प्रियकुमार रंजन ,वय २२ वर्षे, रा.ठी. मुळ गाव दानापुर, जिल्हा पटना, राज्य बिहार असे सांगितले. त्यास अधिक चौकशी करणेकामी साकीनाका पोलीस ठाणेस घेवून आले. पोलीस ठाणेस आणुन त्याचेकडे अधिक व सखोल चौकशी केली असता त्याने सांगितले की, तो प्रेम पासवान हत्त्या प्रकरण, पटना, राज्य बिहार यामध्ये पाहिजे आरोपी आहे. तसेच त्याने सांगितले कि, तो मागील ०८ महिन्यांपासुन फरार आहे व सदरचा गुन्हा हा परसा बजार पोलीस ठाणे, पटना, बिहार या पोलीस ठाणेस सदरचा गुन्हा नोदं असल्याचे त्याने सांगितले. तसेच तो मागील १० दिवसांपुर्वी मुंबई येथे आला असुन मागील १० दिवसांपासुन तो ब्लॉसम डॉरमेटी, सोसायटी मस्जीदच्या जवळ, अंधेरी घाटकोपर रोड, साकीनाका, मुंबई ७२ या ठिकाणी राहत आहे असे सांगितले.

त्यानंतर परसा बाजार पोलीस ठाणे पटना, राज्य बिहार येथे सपर्क कले असता प्रभारी अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली की, परसा बाजार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०४/२३ कलम ३०२,१२० ब ,३४ भा.द.वी. सह कलम २७ आर्म्स ॲक्ट सह कलम ३(२)(५) (अ)( अं ) एस सी एस टी ॲक्ट या कलमान्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये नवीन कुमार प्रियकमुार रंजन ,वय २२ वर्षे हा पाहिजे आरोपी आहे. त्याबाबत अधिक माहितीची खात्री झाल्यानंतर सदर इसमास ताब्यात घेण्याकामी परसा पोलीस ठाणेची एस्कॅार्टींग पार्टी मुंबई येथे येत असुन सदर आरोपीतास अधिक तपासकामी परसा बाजार पोलीस ठाणे, पटना, राज्य बिहार यांचे ताब्यात देण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

सदर यशस्वी कामगिरी मा.पोलीस सह आयुक्त (का व सु ) बृहन्मुंबई श्री.सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री. परमजितसिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१०, श्री. दत्ता नलावडे, मा. सहायक पोलीस आयुक्त साकीनाका विभाग, श्री.भारतकुमार सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गबाजी चिमटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक योगेश शिंदे (गुन्हे) यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली यांचे मार्गदर्शनाखाली साकीनाका पोलीस ठाणचे पोउपनि सुहास कादे, पोह. ०४०८८५/सोनवणे, पो.शि.०६१८६१/बर्डे, पो.शि. ०७१०१४/पाटील, पोशि ०७०३३६/भिंगावडे यांनी केली आहे.